दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ११९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२३ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

महाड शहरात शिरले पुराचे पाणी



कोकणात ढगफुटी ; मुंबई-गोवा महामार्ग बंद

रत्नागिरी : वृत्तसंस्था

अतिमुसळधार पावसाचा मोठा तडाखा कोकणाला बसला असून रत्नागिरी जिल्ह्याला महापुराचा सामना करावा लागत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल चिपळूण, खेडसह ज्या ज्या भागात खाड्या आहेत, त्या त्या भागात पुराचा मोठा फटका बसला आहे. चिपळूणमध्ये बस स्थानक पाण्याखाली गेलं असून अक्षरश: बस पाण्यात बुडाल्या आहेत. तर, चिपळूण नगरीत स्वागताची कमानही पाण्यात बुडालेली दिसून येत आहे.

कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: सातारा जिल्ह्यात महाबळेश्वरला अतिमुसळधार पाऊस पडल्याने खेडच्या जगबुडी नदीच्या पाण्यात मोठी वाढ झाली आहे. समुद्र जवळ असल्याने पूर आला तरी त्याचा निचरा कमी वेळेत होतो, हा आजवरचा अनुभव आहे. खाड्या आणि नद्यांमधून पाणी समुद्राला मिळते आणि पुराचे पाणी काही तासातच ओसरते. गुरुवारी मात्र अस्मानी संकटाने कहर केला. रात्री अतिमुसळधार पाऊस सुरू झाला. त्यातच पहाटे ३ वाजता भरती सुरु झाली. त्यामुळे खाड्यांमधून पाणी वाहून जाण्याऐवजी पाणी आत येऊ लागले. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास वाव मिळाला नाही आणि बहुतांश भागाला पुराच्या पाण्याने दणका दिला. चिपळूणमध्ये वाशिष्ठी नदी, खेडमध्ये जगबुडी नदी, रत्नागिरी तालुक्यात सोमेश्वरची खाडी, काजळी नदी यांचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. मात्र भरतीमुळे पावसाचे पाणी वाहून गेले नाही. त्यामुळे या सर्व ठिकाणी पूर आला. चिपळूणमधील गावात पाणी शिरल्याचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये, बस स्थानकातील बस पूर्णपणे पाण्यात बुडून गेल्याचं दिसून येत आहे. त्यासोबतच, शहरातील अनेक ठिकाणच्या चारचाकी गाड्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्या आहेत.

कर्जत तालुका जलमय ; दोन जण वाहून गेले

घरांमध्ये पाणी शिरले, पूल पाण्याखाली



दै.रायगड नगरी । कर्जत

ढगफुटी सदृश पाऊस २१ जुलै रोजी झाल्याने कर्जत तालुका जलमय झाला होता. कर्जत शहरातील अनेक भागात आणि उल्हासनदीच्या तीरावर असलेल्या अनेक गावांत महापूराचे पाणी शिरले.पाली वसाहत येथे दरड कोसळली तर काही पूल आणि रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली होती तर सायंकाळी खंडित झालेला वीज पुरवठा दुपारी दोन वाजता पूर्ववत झाला.दामत येथे पुलाजवळ चाळ बांधून राहणारे कुटुंबातील दोघे वाहून गेले आहेत. दरम्यान,महापुराचे पाणी मध्यरात्री नंतर अचानक वाढून गावागावांत शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे.

जोरदार पर्जन्यवृष्टी होणार असे वेधशाळेने जाहीर केले होते, त्यानुसार कर्जत तालुक्यात ३२१ मिलिमीटर तर माथेरान येथे ३११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.खंडाळा घाटात उगम पावणाऱ्या उल्हासनदीचे पाणी मध्यरात्री १२ नंतर वाढण्यास सुरुवात झाली.कर्जत दहिवली येथील पायपूल वजा बंधारा बांधण्यात आल्यानंतर कर्जत शहरात महापूराचे पाणी येत नाही.त्यामुळे निर्धास्त झोपलेल्या कर्जत शहरातील इंदिरानगर,कोतवालनगर,म्हाडा कॉलनी,महावीर पेठ,अभिनव शाळा परिसर, कचेरी खालील मुद्रे,नानामास्टर आणि समर्थ नगर भागाला महापुराच्या पाण्याने वेढा घातला होता.या पायपूल वजा बंधाऱ्यांची उंची ४५ मीटर असताना त्या बांधाऱ्यावरून महापूराचे पाणी जात होते. याचवेळी पुढे उल्हासनदीचे हे पाणी जात असलेल्या भागातील अनेक गावांत पाणी शिरले. उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या वावे, बेडसे, बार्डी, मालवाडी, कोल्हारे, कोल्हारे कातकरी वाडी, धामोते, तळवडे, मालेगाव, हंबरपाडा, बिरदिले या गावातील अनेक घरात महापुराचे पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. उल्हासनदीवरील दहिवली येथील पुल लागोपाठ दुसऱ्या दिवशी पाण्याखाली गेला असून सकाळ पर्यन्त पुलावरून तब्बल ४ ते ५ फूट पाणी वाहत होते. त्यात नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील धामोते येथील रस्ता तसेच रेल्वे फाटक येथील रस्ता पाण्याखाली गेला होता. दहिवली भागातून हे पाणी कोदिवले गावाकडे गेल्याने हंबरपाडा सोसायटीपासून दहिवली गावापर्यन्तचा रस्ता पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद होती. या पाण्याच्या प्रवाहामुळे बोपेले तळवडे मार्गावरील कोल्हारे कातकरी वाडी येथील रस्ता वाहून गेला आहे. नदीच्या जवळ असलेल्या बिरडोले गावातील अर्ध्या घरात महापूरचे पाणी शिरले तर नेरळ–कळंब रस्त्यावरील धामोते पूल पाण्याखाली गेले आणि धामोते गावातील ३० घरात पुराचे पाणी शिरले.

नेरळ गावातील मातोश्री नगरला २० तास पाण्याच्या वेढा होता,तेथील चंचे चाळ पुन्हा पाण्याखाली गेली होती तर गंगानगर मधील इमारतीची संरक्षण भिंत कोसळली असून स्थानिकांकडून ग्रामपंचायत कडे गेली तीन वर्षे निवेदन दिले जात असून गटारे बांधली जात नाहीत असा स्थानिकांचा आरोप आहे.नेरळ मधील राही हॉटेल पार्किंग मधील काही गाड्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या असून वाल्मिकीनगर भागाला चारही बाजुंनी पाण्याचा वेढा होता,तर राही हॉटेल परिसरातील १०० हुन अधिक घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. माथेरान–नेरळ रस्त्यावर मोठे झाड

.../२

सुकेळी खिंडीत दरडी कोसळण्यास सुरुवात : वाहन चालकांत भीतीचे वातावरण

दै.रायगड नगरी । वाकण

मुंबई – गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे गेल्या अनेक वर्षांनंतरही अपूर्ण आहे. नागोठणे भागातील महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम तर अंत्यत संथगतीने सुरु आहे. यातच पावसाला सुरु झाल्यापासुन महामार्गाचे रुंदिकरणाचे काम तर नागोठणे भागात जवळजवळ ठप्पच झाले आहे. त्यामुळे याच मार्गावरील अपघातासाठी धोकादायक खिंड म्हणुन ओळखली जाणाऱ्या सुकेळी खिंडीमध्ये दरडी कोसळु लागल्या आहेत. त्यामुळेच खिंडीतून वाहन चालवितांना चालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षी सुकेळी खिंड ही पावसाळ्यात वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अडचणीची ठरत आहे. खिंडीमधिल रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी खिंडीमधिल जे डोंगर खोदले गेले आहेत त्यामुळे दोन दिवसांपुर्वी झालेल्या मुसळधार पावसात महामार्गावरील जुन्या रस्त्यावर मोठ मोठे दगड गोठे व माती मोठ्या प्रमाणात खाली आले होते. त्यामुळे जुन्या रस्त्यावरुन वाहतुक बंद करण्यात आली होती . त्यामुळे थोड्या फार प्रमाणात वाहतुक कोंडी देखिल झाली होती. पंरतु महामार्ग पोलिसांनी तात्काल घटनास्थळी जाऊन नव्यानेच काम करण्यात आलेल्या रस्त्यावरुन जाणारी येणारी वाहतुक सुरु करण्यात आली होती.

याशिवाय सुकेळी खिंडीसह महामार्गावरील अनेक ठिकाणच्या साईडपट्ट्या,

.../२

सैनिकी शिक्षणासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून ५0 हजारांची आर्थिक मदत

दै.रायगड नगरी । पनवेल

सांगली येथे सैनिकी शिक्षण घेत असलेल्या पनवेलमधील आयुष गुरुप्रसाद मार्गी याला शिक्षणासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते आयुषच्या पालकांकडे आज (दि. २२) सुपूर्द करण्यात आला.

पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथील सोळा वर्षीय आयुष मार्गी हा सांगली जिल्ह्यातील बहादूरवाडी येथील आदर्श करिअर अकॅडमीमध्ये अकरावी सायन्स व आर्मीचे प्रशिक्षण घेत आहे. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने नगरसेविका दर्शना भोईर यांच्या मार्फत त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे आर्थिक मदतीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंडळाच्या माध्यमातून आयुषला शिक्षणासाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. या बहुमोल मदतीबद्दल मार्गी कुटुंबीयांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे सचिव परेश ठाकूर तसेच नगरसेविका दर्शना भोईर यांचे आभार मानले.

सिडकोच्या प्रयत्नांना आले यश; नवी मुंबई आणि नैना क्षेत्रातील...

उंचीबाबतचे वैध ना हरकत प्रमाणपत्र असणाऱ्या बांधकामांना मिळणार परवानगी

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सिडको महामंडळाकडून नवी मुंबईमध्ये विकसित करण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर, नवी मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) येथील ज्या बांधकाम प्रकल्पांना भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून उंचीबाबतचे वैध ना–हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा बांधकामांना परवानगी देण्यात येणार आहे. विमानतळ प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्रात नमूद अनुज्ञेय उंचीपर्यंतची बांधकामे विकासकांना करता येणार आहेत.

.../२

> ज्या विकासकांकडे बांधकाम उंचीबाबतची वैध प्रमाणपत्रे आहेत त्यांना लवकरच सिडकोकडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नवी मुंबई आणि नैना क्षेत्रांतील बांधकाम प्रकल्पांसमोरचा अडथळा दूर होऊन या भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्याचप्रमाणे, संबंधित विकासक व नागरिक यांनाही या निर्णयामुळे निश्चितच दिलासा मिळणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी,**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

पाली व जांभूळपाडा नदी पुलावरून सलग दुसऱ्या दिवशीही पाणी

तासनतास वाहतूक ठप्प, प्रवाशी नोकरदार वर्गाचे प्रचंड हाल

दै.रायगड नगरी । पाली /बेणसे

रायगड जिल्ह्याला हवामान खात्याने २४ जुलै पर्यंत अतिवृष्टी चा इशारा दिला आहे. त्यानुसार पाली सुधागड सह जिल्ह्याला मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले. सुधागड तालुक्यात बुधवारी दि.(२१ व)गुरुवारी (दि.२२) रोजी अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे सलग दोन दिवस वाकण-पाली-खोपोली राष्ट्रीय महामार्गावरील पाली आंबा नदी पुलांवरून पाणी गेले. येथील पाण्याचा प्रवाह वेगवान होता. तसेच जांभूळपाडा आंबा नदी पुलाला देखील पाण्याने वेढा दिल्याचे दिसून आले.

तालुक्यात काही ठिकाणी गुरांचे गोठे ढासळले, तर काही ठिकाणी रस्ते खचले, दरडींचा धोका देखील अनेक घरांना जाणवत असल्याने प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेतली. पुलावरून पाणी जाण्याची समस्यां नित्याचीच झालीय. अतिवृष्टी झाली की या मार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक बंद ठेवण्यात येते. जांभुळपाडा गावात नदी काठी असलेल्या काही घरांना पाण्याने वेढा दिला. तसेच पालीजवळ भाग्यश्री प्लाझा जवळ पाणी आले होते. आंबा नदीच्या सभोवताली मोठ्या प्रमाणावर भराव टाकून इमारती उभारल्या जात असल्याने पुराचे पाणी गावात शिरण्याचा धोका आता जानवू लागला आहे. सभोवतालच्या शेती पाण्याखाली गेल्याने पिकांची नासाडी होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची चिन्ह दिसू लागली आहेत. तर पाली आणि बलाप येथील काही घरांना पाण्याने वेढा दिला होता. दरवर्षी जुलै महिन्यात मुसळधार पाऊस होतो, पाऊस थांबण्याचे नाव घेत नाहीये, अविश्रांत कोसळणाऱ्या पावसाने नागरिक बेजार झाले आहेत. सर्वत्र पूर आल्याने जनजीवन विस्कळीत झाले . रहदारीचे मुख्य रस्ते बंद झाल्याने नोकरदार वर्गाला सक्तीची रजा घ्यावी लागली. दरम्यान पाली बसस्थानक आवारात देखील मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याने एस.टी बसेस येण्या जाण्याचा मार्ग रोखला गेला. त्यामुळे नागरिक, प्रवाशी वर्गाचे अतोनात हाल झाले. तर एरव्ही सणासुदीच्या दिवशी गजबजलेल्या बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. आभाळ फाटल्या प्रमाणे कोसळणाऱ्या पावसाने सारेच बेजार झालेत. पावसाचा जोर वाढल्याने ऐन सण व उत्सवात एकमेकांच्या घरी जाणे शक्य नसल्याने साऱ्यांचा हिरमोड झाला आहे. अशातच पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार, पाली पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, तसेच नागोठणे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन आपत्ती व्यवस्थापणाच्या

.../२

वास्तवापासून पळ

ब्रिटिशांनी भारतावर राज्य करताना ज्या चांगल्या प्रथा किंवा परंपरा निर्माण केल्या; त्यातली एक जनगणनेची आहे. ती भारतात नीट चालू असून, दर दहा वर्षांनी जनगणना होते. सन २०११ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना जनगणना झाली होती. त्यानंतर २०२१ मध्ये जनगणना पुरी व्हायला हवी होती. त्यासाठी, तिची प्रत्यक्ष तयारी दोन वर्षे आधीच सुरू व्हावी लागते; मात्र करोनामुळे यावेळी या साऱ्याला कमालीचा विलंब होतो आहे. या संबंधी केंद्र सरकारने नुकतेच संसदेत जे निवेदन दिले, ते फारसे समाधानकारक नाही. सरकारने लोकसभेत निवेदन केले, की विलंब झाला असला तरी आता जनगणना होणार असून, तीत केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, म्हणजे एससी, एसटी यांचीच नोंद होईल. याचा अर्थ, गेले अनेक दिवस होत असलेली जातनिहाय जनगणना करण्याची मागणी मोदी सरकारने मनावर घेतलेली नाही. हे योग्य झालेले नाही. महाराष्ट्रासहित देशभरात सध्या आरक्षणाचा मुद्दा तापला आहे. महाराष्ट्रात मराठा समाज आरक्षणाची मागणी करतो आहे. तसे आरक्षण देण्यातील घटनात्मक अडचणही अनेकदा समोर आली आहे. याशिवाय, ओबीसींना दिल्या जाणाऱ्या आरक्षणातील वर्गवारी आणि विभागणी यांचेही काही प्रश्न आहेत. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत निवेदन करताना, भारतीय राज्यघटनेत नोंद असणाऱ्या एससी आणि एसटी या वर्गातील नागरिकांची स्वतंत्रपणे मोजणी केली जाईल, असे म्हटले आहे. इतर नागरिकांची जातिनिहाय नोंदणी होणार नाही. सन २०११ मध्ये तेव्हाच्या यूपीए सरकारने जातनिहाय जनगणना केली होती. ती झाली तेव्हा लोकसभेतील विरोधी पक्षनेत्या सुषमा स्वराज यांनी जातिनिहाय जनगणना करण्यास पाठिंबा दिला होता आणि तशी ती होण्यातील फायदेही सभागृहासमोर मांडले होते. तेव्हा केंद्रीय गृहमंत्री असणाऱ्या पी. चिदंबरम यांनी जनगणना करताना अशा प्रकारच्या जातिनिहाय नोंदणीला विरोध केला होता. जनगणना झाली, तरी तिचे अनेक अंगांनी विश्लेषण करण्याचे काम पुढे बराच काळ चालते. कधी कधी त्याला तीन–चार वर्षेही लागू शकतात. मागची जनगणना जातिनिहाय झाल्यानंतर जो तपशील जमा झाला; त्याचे निष्कर्ष किंवा वर्गवारी जाहीर करण्याची मागणी वारंवार होत असते. तो तपशीलही अद्याप जाहीर झालेला नाही. यात 'इम्पिरिकल डेटा' असा शब्द वारंवार वापरला जातो. विशेषतः, महाराष्ट्रातील ओबीसी व मराठा आरक्षणाच्या संदर्भात तो येतो. 'इम्पिरिकल' म्हणजे औपचारिक, तथ्यात्मक, व्यावहारिक, अनुभवजन्य. हा डेटा केवळ सांख्यिकी निष्कर्ष किंवा आकडेवारी न सांगता, त्या त्या समाजाची विविध निकषांनी तपासलेली जीवन गुणवत्ता सांगत असतो. अशी जीवन गुणवत्ता शिक्षण, राहणीमान वगैरे अनेक निकषांनी ठरत असते. हे सारे समजले, तर प्रत्येक समाजाला आरक्षण देताना या तपशिलांचा उपयोग होऊ शकतो; मात्र गेल्या जनगणनेतील हा 'इम्पिरिकल डेटा' अजूनही स्पष्टपणे जाहीर करण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने केवळ एससी आणि एसटी इतक्याच वर्गवारीची नोंद नव्या जनगणनेत करण्यापेक्षा, गेल्या जनगणनेप्रमाणेच याहीवेळी जातनिहाय नोंद करण्याचा निर्णय का घेतला नाही, हे कळायला मार्ग नाही. सध्या देशातील विविध न्यायालयांसमोर आरक्षणाचा मुद्दा वेगवेगळ्या निमित्तांनी आलेलाच आहे; त्यामुळे याही प्रश्नावर नव्याने काही याचिका दाखल झाल्यास नवल नाही. देशातील साऱ्याच आरक्षणाच्या मागण्या या २०११च्या जनगणनेतील नोंदीच्या आधारे हाताळायच्या असतील, तर तसे केंद्र सरकारने स्पष्टपणे सांगायला हवे. गेल्या वेळी जनगणनेत देशात जवळपास ४६ हजार विविध प्रकारच्या जनगटांची नोंद करण्यात आली होती. या गटांना केवळ 'जात' या वर्गवारीत टाकता येणार नाही. हा आकडा भारतातील सर्वच प्रकारचे वैविध्य दाखविण्यास पुरेसा आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात जे आरक्षण विविध जातिसमूहांना दिले जाते किंवा मागितले जाते; त्या साऱ्यांना जर नेमका संख्याशास्त्रीय आधार द्यायचा असेल, तर जातिनिहाय जनगणनेला दुसरा पर्याय नाही. भारताच्या समाजशास्त्रीय इतिहासात 'जात' हा स्थिर घटक नसून तोही उत्क्रांत होणारा, आपले रूप बदलणारा असल्याचे दिसून येते. जात नोंदणे म्हणजे जातींचे बंदिस्त, अचल पिंजरे तयार करणे, असेही काही समाजशास्त्रज्ञांना वाटते; मात्र भारतातला सध्याचा जातींचा प्रश्न हा विकासाच्या अनुषंगाने अधिक तीव्र बनला आहे. शिक्षणाच्या आणि विकासाच्या संधीसाठी आपापल्या जातींची ओळख पक्की व ठाशीव करण्याकडे समाजघटकांचा कल आहे. यात जसे आपल्या विकास प्रक्रियेचे अपयश आहे; तशीच ती आपल्या शेकडो वर्षांच्या समाजरचनेची वर्तमान काळात मोजावी लागणारी अटळ किंमतही आहे. येत्या जनगणनेत जातिनिहाय नोंदी न करणे, म्हणजे या वास्तवापासून पळून जाणे आहे. केंद्र सरकारने तसे करू नये.

विजय रोडे यांचे दुःखद निधन

दै.रायगड नगरी । तळा

तळा येथील शिंपी समाजाचे ज्येष्ठ समाजबांधव विजयानंद मुकूंद रोडे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी दुःखद निधन झाले. पनवेल येथील मंडळ अधिकारी संदीप रोडे यांचे ते काका होते.

शिक्षणाविषयी प्रचंड आपुलकी असलेले व्यक्तीमत्व अशी त्यांची ओळख होती. शिक्षक म्हणजे रोडे गुरुजी असे त्यांचे नावलौकिक होते. रोडे गुरुजी हे राधाकृष्ण मंदिर शतक महोत्सव समितीचे देखील अध्यक्ष होते. शनिवार दि.३१ जुलै रोजी सकाळी ९ वाजता तळा येथे त्यांचा दशक्रिया विधी होणार आहे. विजय रोडे यांना रायगड जिल्हा शिंपी समाज महासंघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

जेष्ठ पत्रकार नवीनचंद्र सोष्टे यांचे कोरोनाने निधन

दै.रायगड नगरी । वाकण

नागोठणे येथील जेष्ठ पत्रकार नवीनचंद्र नारायण सोष्टे यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गुरुवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास कोरोना संसर्गमुळे निधन झाले. गेले १७ दिवस नवीनचंद्र सोष्टे यांनी कोरोनाशी जिकरीचे झुंझ दिली. परंतु अखेर कोरोनाने त्यांचा बळी घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

नवीनचंद्र सोष्टे हे कोरोना संसर्गामुळे अलिबाग येथील सामान्य रुग्णालयात दाखल झाल्याचे समजल्यानंतर आ. अनिकेतभाई तटकरे रोजच्या रोज त्यांच्या तब्बेतीची माहिती संबंधित डॉक्टरांशी चर्चा करुन घेत होते. त्यानंतरही अखेर कोरोनाने त्यांचा बळी घेतलाच. जेष्ठ पत्रकार नवीनचंद्र सोष्टे यांच्या निधनाने नागोठणेसह रायगड जिल्ह्यातील पत्रकारितेतील मोठा आधार गेला असल्याची प्रतिक्रिया नागोठणेकर नागरिकांनी व्यक्त केली. नवीनचंद्र सोष्टे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नात, नातू, असा परिवार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

कर्जत तालुका जलमय ; दोन जण वाहून गेले

कोसळले होते त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक बंद होती.तर नेरळ – माथेरान घाटरस्त्यात नांगरखिंड येथे झाड रस्त्यात पडले होते, तर संपूर्ण घाट रस्त्यात डोंगरातील दगड येऊन पडले आहेत. मात्र घाट रस्त्यात एकेरी वाहतूक सुरू आहे. तालुक्यातील आसल ग्रामपंचायत मधील कातकरी वाडीमधील १५ घरात महापुराचे पाणी शिरले असता त्या आदिवासी कुटुंबाच्या घरात अन्न धान्य भिजून गेल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सरपंच रमेश लदगे आणि अन्य कार्यकर्ते यांच्या माध्यमातून आदिवासी लोकांना धान्य वाटप करण्यात आले.याच वाडीमधील भगवान घोगरकर यांच्या गोठ्यात पाणी साठून राहिल्याने १२ शेळया मृत झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.उमरोली ग्रामपंचायत हद्दीमधील पाली वसाहतच्या मागे असलेला डोंगर भूस्खलन झाल्याने खचला.यात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही,मात्र डोंगराचा भाग दगड– मातीसह खाली येण्याची शक्यता असक्याने प्रांत अधिकारी वैशाली परदेशी, तहसीलदार विक्रम देशमुख यांनी तातडीने तेथे जात दरडीच्या छायेत असलेल्या रहिवाशांचे स्थलांतरण करण्यास सुरुवात केली आहे.

भिवपुरी रेल्वे स्थानक जवळील डायमंड सोसायटी मध्ये पाणी शिरल्याने रहिवाशांना बाहेर पडता येत नव्हते तर स्टेशन कडे जाणारा रस्ता पाण्याखाली गेला होता. पावसाबरोबर सुरू असलेल्या वादळात भिवपुरी स्टेशन जवळील ओएचई वीज वाहून नेणारा खांब अर्धवट अवस्थेत कोसळला आहे,तो पुन्हा उभा करण्याचे मध्य रेल्वे कडून प्रयत्न सुरू होते.जामरुंग परिसरातील रजपे– टेंभरे यांना जोडणारा साकव पूल वाहून गेला असून भालीवडी परिसरातील मालवाडी येथील शेतकऱ्यांच्या तीन पोल्ट्री फार्म शेड मध्ये पाणी शिरल्याने १२०० पक्षी मृत झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

कर्जत– कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर दामत येथे पाणी रस्त्यावरून वाहत जात होते.दामत येथे शेलू कडे जात असताना नाल्याच्या कडेला असलेल्या चाळीत काही कुटुंब राहतात.त्यातील मुनियार कुटुंबातील इब्राहिम मुनियार–४६,झोया इब्राहिम मुनियार–६ हे दोघे रात्री दोन च्या सुमारास पुराच्या पाण्यात वाहून गेले. त्या चाळीत स्थानिक झोपलेले असताना पुराचे पाणी शिरल्याने काही समजायचे आत अनर्थ घडला.त्या चाळीपासून अर्ध्या किलोमीटर वर उल्हास नदी असून उल्हासनदीने रुद्ररूप धारण केल्याने त्या दोघांचा शोध घेण्यात अडचणी येत होत्या.

सुकेळी खिंडीत दरडी कोसळण्यास सुरुवात : वाहन चालकांत भीतीचे वातावरण

मोरव्या पाण्याच्या प्रवाहासोबत वाहुन गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तसेच रस्त्याच्या साईडपट्टया तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या मोरव्या देखील सध्या खचल्या असुन भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यापुढे जर का दरडी कोसळण्याचे प्रमाण कमी करायच्या असतील तर योग्य त्या उपाययोजना वेळीच करणे गरजेचे आहे अशी मागणी वाहन चालकांतून होत आहे.

उंचीबाबतचे वैध ना हरकत प्रमाणपत्र असणाऱ्या बांधकामांना मिळणार परवानगी

सिडकोकडून नवी मुंबईच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात ११६० हेक्टरवर आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारण्यात येत आहे. सदर विमानतळामुळे नजीकच्या नवी मुंबई तसेच नैना क्षेत्रातील बांधकामांच्या उंचीवर मर्यादा घालण्यात आल्या होत्या. यामुळे अनेक बांधकाम प्रकल्पांना, विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने, सिडकोकडून बांधकाम ना–हरकत प्रमाणपत्र मिळाले असले तरी त्यांचा विकास रखडला होता.

या पार्श्वभूमीवर सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी पुढाकार घेऊन भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि विमानतळ विकसित करणारी सवलतधारक कंपनी नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लि. यांच्या सहकार्याने या प्रश्नाबाबत मार्ग काढला. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी सिडको, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लि. यांच्या प्रतिनिधींच्या अनेक बैठका झाल्या. यानंतर ज्या बांधकाम प्रकल्पांना भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून उंचीविषयक ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे व जे वैध आहे, अशा बांधकामांना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला.

पाली व जांभूळपाडा नदी पुलावरून सलग दुसऱ्या दिवशीही पाणी

दृष्टीने सज्ज होते. वाकण नाक्यावर मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात होता. पाली खोपोली मार्गाकडे जाणारी वाहने यांना सातत्याने परिस्थिती ची माहिती दिली जात होती. सुधागड तालुक्यात प्रशासनाकडून देखील नागरिकांना व नदी काठच्या गावांना सतर्कतेचा ईशारा दिला आहे. वाकण फाट्यावर, पाली व जांभुळपाडा अंबा नदी पूल येथे पोलीस तैनात करण्यात आले होते. पुलावरून पाणी गेल्याने वाहनांना प्रवेश नाकारला होता. पाली व जांभुळपाडा पुलावरून पाणी गेल्याने पोलिसांनी वाकण वरून खोपोलीकडे जाणारी व खोपोली पाली वाकण कडे होणारी वाहतूक बंद केली होती. त्यामुळे या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. याबरोबरच नांदगाव व शिळोशी येथील पुलावरून देखील पाणी गेले होते. येथील टेंबी वसाहतीला देखील पाण्याने वेढा दिला होता. सर्वत्र खोलगट व सखोल भागात पाणी शिरले आहे. विहिरी, नद्या, नाले, तलाव व ओढे पाण्याने तुडुंब भरून वाहत आहेत. पाण्याचा वाढता वेगवान प्रवाह व संभाव्य धोका पाहता प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला व कामाशिवाय बाहेर न पडण्याचे आवाहन केले.

इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालया समोर दारुड्यांचा हैदोस ; संबंधितांवर कारवाई करण्याचे व.पो.नि.यांचे आदेश

दै.रायगड नगरी । उरण

उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयासमोर मोरा पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम अर्धवट स्थितीत आहे. तिथे वीज सुद्धा नाही. सदर परिसरात पोलिस स्टेशनचे इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

मात्र या ठिकाणी कोणीही नसल्याचे पाहून दारुडे,गर्दुले यांनी आपले ठाण मांडले आहे. आपला बसतानच येथे मांडला आहे.दररोज येथे काही व्यक्ती दारू पिण्यासाठी येत आहेत. येथून जवळच असलेल्या रस्त्यावरून येणार्याज जाणार्या महिलांना, मुलींना याचा नाहक त्रास होत आहे.

त्यामुळे महिलांची सुरक्षितता यामुळे धोक्यात आली आहे. सदर या परिसरात दारू पिणारे,टाइमपास करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उरण तालुका संघटक सतीश पाटील, विभाग प्रमुख विभाग अध्यक्ष अनिकेत पाटील यांनी उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र बुधवंत यांच्याकडे केली आहे.

उरण पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी कोणी अवैध आणि बेकायदेशीर कामे करत असतील, महिलांना त्रास देत असेल तर त्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असे रवींद्र बुधवंत यांनी सांगितले. या समस्या बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र बुधवंत यांनी या प्रकरणी संबंधितांवर कायदेशीर करण्याचे आदेश उरण पोलीसांना दिले आहेत.

शासनाच्या खावटी अनुदान योजनेपासून एकही लाभार्थी वंचित राहता कामा नये : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्य शासनाच्या वतीने गरीब समाज असणाऱ्या आदिवासी कुटुंबासाठी सुरु करण्यात आलेल्या खावटी वाटप योजनेची सुरुवात रायगड जिल्ह्यातून करण्यात आली असून या योजनेतील एकही लाभार्थी वंचित राहू नये, असे प्रतिपादन पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी केले.

नुकतेच कर्जत तालुक्यातील पिंगळस शासकीय माध्यमिक आश्रमशाळा येथे झालेल्या खावटी वाटप कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. कर्जत येथे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना खावटी अन्नधान्य कीट वाटप देवून कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील, सदस्या सौ.रेखा भास्कर दिसले, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, सहायक प्रकल्प अधिकारी श्री.खेडकर, तहसिलदार विक्रम देशमुख, गटविकास अधिकारी बालाजी पुरी तसेच आश्रमशाळेचे शिक्षक वर्ग आदि उपस्थिती होते. यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यातील ४८ हजारहून अधिक लाभार्थ्यांना आदिवासी विभागांतर्गत खावटी अनुदान योजनेतून अन्नधान्य, किराणा साहित्य वाटप करण्यास सुरुवात झाली असून कर्जत तालुक्यातील लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरुपात खावटी योजनेचा प्रांरभ करण्यात आला आहे. खावटी योजना आदिवासी बांधवांच्या हक्काची योजना असून या योजनेचा अधिकाधिक लाभ आदिवासी बांधवांना द्यावा. ड़जिल्ह्यातील आदिवासी विभागासाठी अधिकाधिक निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी विविध शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मे.राव साहेब

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अ.क्र.८५७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.मंगळा प्रभाकर पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.प्रिती प्रभाकर पाटील
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.प्रथमेश प्रभाकर पाटील
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.प्रभाकर पाटील, हाऊस नं.२२,
नागाव रोड, मांडळ आळी, नागाव,
ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील हे दि.२२/०५/२०२० रोजी मौजे : नागाव मांडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.बाबीबाई जगन्नाथ पाटील ह्या दि.१४/१२/२०१० रोजी मौजे : नागाव मांडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
म्हातवली	६	२८–३ (१) +१+२/B	१–४–८	०–४५–१

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अ‍ॅवॉर्ड हा कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील यांचे वारसदार या नात्याने कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.प्रभाकर जगन्नाथ पाटील यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.राव साहेब

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अ.क्र.८६५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.निलक्षा निशिकांत पाटील
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विरेंद्र निशिकांत पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.विनिया निशिकांत पाटील
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
पारा जवळ, ८४५ बोरी, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.अस्मिता अमित थळी
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
वीरा लेन, कुंभारवाडा ६६५ अे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.निशिकांत जगन्नाथ पाटील हे दि.१४/०३/२०२० रोजी मौजे : नागाव मांडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.बाबीबाई जगन्नाथ पाटील ह्या दि.१४/१२/२०१० रोजी मौजे : नागाव मांडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.निशिकांत जगन्नाथ पाटील यांचे आईच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
म्हातवली	६	२८–३ (१) +१+२/B	१–४–८	०–४५–१

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अ‍ॅवॉर्ड हा कै.निशिकांत जगन्नाथ पाटील यांच्या आईच्या नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.निशिकांत जगन्नाथ पाटील यांचे वारसदार या नात्याने कै.निशिकांत जगन्नाथ पाटील यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.निशिकांत जगन्नाथ पाटील यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पनवेल महानगरपालिका
जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी–१ नमुन्यात मागवित आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत रु.	अनामत रक्कम रु.	निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर= एकूण निविदा किंमत	कामाची मुदत
१	**पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ''ड'' फा. प्लॉट नं.२४७ महापालिका मालकीच्या शॉपिंग कॉम्प्लेक्सचे पत्रे बसविणे व इतर दुरुस्ती करणे.**	३,१५,७६४/– (Without GST)	३२००/–	५००+९०=५९०	३० दिवस

या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.२३/०७/२०२१ पासून दि.०६/०८/२०२१ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत (या कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र.१ मध्ये सादर करण्याचा आहे.
२) सिलबंद निविदा दि.०९/०८/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्वीकारण्यात येतील.
३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.१०/०८/२०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा ना मंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र.पमपा/बांधकाम/४४२१/प्र.क्र.३९/१५०८/२०२१
दि.२२/०७/२०२१

सही/–
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक २५ जुलै २०२१ रोजी शिवसंपर्क अभियाना अंतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोनाच्या काळात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे हा रक्ताचा तुटवडा लक्षात घेता शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पनवेल,रायगड यांच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बेलपाडा,खारघर येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या रक्तदान शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमासाठी मावळ लोकसभा खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे उपस्थित राहणार असून शिबिराचे उदघाटन पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी शिवसेना पनवेल विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, जिल्हा सल्लागार, उपजिल्हाप्रमुख, उपजिल्हा संघटक, तालुका प्रमुख, तालुका संघटक, विधानसभा संघटक, महानगरप्रमुख, महानगर संघटक, उपतालुका प्रमुख, विधानसभा समन्वयक, महानगर समन्वयक, तालुका संपर्क प्रमुख, उपमहानगर प्रमुख, शहर प्रमुख, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, गट प्रमुख, महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका, उपजिल्हा संघटिका, विधानसभा संघटिका, तालुका संपर्क संघटिका, तालुका संघटिका, महानगर संघटिका, उपतालुका संघटिका, उपमहानगर संघटिका, शहर संघटिका, सर्व महिला पदाधिकारी, युवासेनेचे जिल्हा अधिकारी, उपजिल्हा अधिकारी, जिल्हा समन्वयक, विधानसभा अधिकारी, तसेच सर्व युवा अधिकारी,व युवतीसेनेचे जिल्हाअधिकारी, उपजिल्हा अधिकारी, विधानसभा अधिकारी, उपविधानसभा अधिकारी, शहर अधिकारी व सर्व पदाधिकारी तसेच शिवसेनेच्या आजी माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे तसेच रक्तदान करण्यास व शिबिरास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी केले आहे.

लसीचे दोन डोस घेतलेल्या नागरिकांसाठी निर्बंध शिथिल करणार : ना.टोपे

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यामध्ये कोरोनाचं प्रमाण दुसऱ्या लाटेत कमी होत असल्याचं चित्र असलं तरी तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात काळजी घेतली जात आहे. राज्यात कोरोनासंबंधी अनेक निर्बंध अजूनही लागू आहेत. हे निर्बंध हटण्यासंबंधी तसेच लसीकरण आणि राज्य सरकारची तयारी असल्याचे राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले आहे.

राजेश टोपे म्हणाले की, राज्यात आपण टप्प्याटप्प्याने निर्बंधामध्ये सुट देत आहोत. विमानतळावर निगेटीव्ह अहवाल असल्याशिवाय परवानगी नसायची, त्यांना आयसोलेट केलं जायचं. आता लसीचे दोन्ही डोस घेतले असतील तर आपण प्रवाशांना मुंबईत प्रवेश देत असल्याची माहिती राजेश टोपे यांनी दिली. दरम्यान, आमची अपेक्षा आहे की, महिने दोन महिन्यात राज्याचे लसीकरण १०० टक्के पूर्ण करण्याची क्षमता महाराष्ट्रात आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदार तर्फे वकील
ॲड.निवृत्ती बाळाराम पावशे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अ.क्र.७१५/२०२१
ने.ता.१८/०८/२०२१

श्रीमती.गोमुबाई वामन ठाकूर
पुर्वाश्रमीची गोमुबाई उंदीर म्हात्रे
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोपरा गाव, पोस्ट खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
विभाग खारघर, पनवेल महानगरपालिका,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा श्रीमती.गोमुबाई वामन ठाकूर, पुर्वाश्रमीची गोमुबाई उंदीर म्हात्रे यांचा जन्म दि.०१/०६/१९५६ रोजी मुर्बी पोस्ट खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. म्हणून अर्जदार श्रीमती.गोमुबाई वामन ठाकूर, पुर्वाश्रमीची गोमुबाई उंदीर म्हात्रे यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्रीमती.गोमुबाई वामन ठाकूर, पुर्वाश्रमीची गोमुबाई उंदीर म्हात्रे हिचा वर नमूद ठिकाणी जन्म झाला आहे किंवा केस हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/७/२०२१ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

करंजा येथील नव्या मत्स बंदरांची ६ फुटाने उंची वाढवा ; खा. श्रीरंग बारणे यांची केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांकडे मागणी

दै.रायगड नगरी । उरण

मावळ लोकसभा मतदारसंघातील रायगड जिल्ह्यातील उरण येथील करंजा मत्सबंदराचे नव्याने काम सुरु आहे. या बांधकामाची उंची व भरतीच्या पाण्याची उंची यामध्ये फक्त एकच फुटाची तफावत आहे. त्यामुळे मोठ्या भरतीच्यावेळी आणि जोरदार वाऱ्यामुळे लाटा तयार झाल्यावर मासेमारी नौकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे नवीन करंजा बंदराची सहा फुटाने उंची वाढवावी. नौकानयन मार्गाची (चॅनेल) ७० मीटरने रुंदी वाढवी. बंदर प्रकल्पाच्या दक्षिण बाजूला (बाहेर) दगडाचे बांधकाम न करता सिमेंट कॉंक्रीटची भिंत बांधावी, अशी आग्रही मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली.

नवीन बंदरामुळे मच्छिमारांना येत असलेले अडचणी, समस्या खासदार बारणे यांनी जाणून घेतल्या. त्यानंतर केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री पुरुषोत्तम रुपाला यांची दिल्लीत प्रत्यक्ष भेट घेतली.

मच्छिमारांना येणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.खासदार बारणे म्हणाले, नवीन करंजा मत्स बंदराचे काम अंतिम टप्प्यात आहे. 'ग्लोबल वार्मिंग'मुळे बंदराची उंची कमी केली जात आहे. ते धोकादायक आहे. जोरदार हवामानामुळे समुद्रातील लाटांचे पाणी आतमध्ये शिरुन मासेमारी नौकांचे नुकसान होऊ शकते. बंदराचे काम पूर्ण झाल्यानंतर उंची वाढविल्यास काम एकजीव होणार नाही. मासेमारी नौकांची ठोकर लागून काम पडून जाईल.

त्यासाठी आत्ताचा करंजा बंदराची ५ ते ६ फुटाने उंची वाढवावी. सध्या तयार केलेला नौकानयन मार्गाची (ॲप्रोच चॅनेल) फक्त ५० मीटर रुंद आहे. याचा अर्थ ऑपरेशन्ससाठी फक्त ४० मीटर वापरली जाईल. यामुळे चॅनेलमध्ये मासेमारी करणाऱ्या बोटींसाठी वाहतुकीची कोंडी होईल. फिशिंग बोटींच्या सुरक्षिततेसाठी आणि सुलभतेसाठी या वाहिनीचे आकार २० मीटर पर्यंत वाढविणे आवश्यक आहे. याची लांबी ७० मीटर असावी. ब्रेकवॉटरच्या भिंतीची लांबी खूपच लहान आहे.

खराब हवामान आणि जोरदार वारा आल्यास मासेमारीसाठी बोटींना अडचणी येतील. त्यामुळे त्याची लांबी सध्याच्या लांबीपेक्षा कमीतकमी १५० मीटरने वाढवावी.

प्रकल्पाच्या दक्षिणेकडील भागात (करंजा फिशिंग हार्बर) फक्त दगडी भिंत बांधली जाणार आहे. ही संसाधने व जागेचा अपव्यय ठरेल. त्यासाठी कॉंक्रीटीकरणाची भिंत बांधावी. जेणेकरुन त्यात मासेमारी होडीची क्षमता वाढेल. इंजिन दुरुस्त करण्यासाठी तसेच मासेमारी करणाऱ्या बोटींच्या इतर दुरुस्तीसाठीही याचा उपयोग होईल. बंदराच्या बांधकामुळे करंजा नवपाडा येथील नैसर्गिक ड्राय डॉग प्रकल्प विस्थापित झाला आहे. या पर्यायी बंदराच्या संरक्षणासाठी वादळी, वारा सुरक्षिततेची काळजी घ्यावी. एक बोट दुसऱ्या बोटीवर आपटू नये यासाठी बांधलेल्या ब्रेक वॉटरची आत्ताची लांबी २०० मीटर आहे. त्यात १५० मीटरने वाढ केली पाहिजे. जेणेकरुन काम करत असलेल्या बोटींचे नुकसान होणार नाही.

करंजा मत्स बंदर बहुउद्देशीय वापरासाठी २० एकर जमीन पुरवतो. यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा विकसित होतील. स्थानिक तरुणांना अधिक रोजगार उपलब्ध होईल. फिशिंगवर आधारित उपक्रमांना संधी मिळेल. महिला सक्षमीकरण होऊन स्थानिक महिला मासेमारीच्या कामांमध्ये तसेच विक्रीपासून ते प्रक्रियेपर्यंत सहभाग घेतील, असेही खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

आडी बंदर मोहल्ला येथे सिलेंडरचा स्फोट, सुदैवाने जीवितहानी टळली

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यातील आडी बंदर मोहल्यातील खलील उस्मान करवेकर यांच्या घरात इदच्या सणाचा स्वयंपाक चालू असताना अचानक सिलेंडर मधून आग सुरु झाली.

हाहा म्हणता संपूर्ण सिलिंडर ने पेट घेतला, संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असताना पुढे जाण्याचं धाडस कोणाचेही होत नसताना गावातील एक तरुण अ. अजीज युसूफ लोगडे हा ३८ वर्षीय तरुणाने धाडस करून गोणत्याच्या सहाय्याने पेटत्या सिलेंडर ला घराबाहेर फरफटत विहिरीपर्यंत ढकलत नेले. विहिरीजवळ जाताच सिलेंडर ने जोरात पेट घेतला आणि क्षणात प्रचंड स्फोट झाला. मात्र सुदैवाने कोणत्याही प्रकारची मनुष्यहानी झाली नाही. केवळ दैव बलवत्तर आणि अ. अजीज लोगडे आणि बिलाल अ. रहमान धनशे यांनी दाखविलेल्या धाडसामुळे फार मोठा अनर्थ टळला. आडी बंदर पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी या दोघांचे कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली.

किल्ला ग्रामपंचायतीचे वतीने गरजूंना भांडी वाटप

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

विविध प्रकारचे उपक्रम राबवून उपक्रमशील ग्रा.पंचायत म्हणून विशेष ओळख असणाऱ्या किल्ला ग्रा.पंचायतीचे वतीने नुकतेच गरजूंना भांडी वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

ग्रा. पंचायत हद्दीतील अशोक नगर येथील गरजू व गरजवंत रहिवासी यांना सदरचे भांडी वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच राकेश बामुगडे, सदस्य दीपक जमदाडे, ग्रामसेवक पुनम पाटील, कार्यकर्ते बाळा पाबरेकर, महेश बामुगडे, रुपेश बामुगडे, विजय दळवी, नरेश चांदोरकर, अध्यक्ष संदीप पालकर, जितेंद्र पालकर, विनोद चांदोरकर, सतीश पालकर, अशोक चांदोरकर, अतिश वाटवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

मे.भाकरे साहेब

ॲड.योगिता पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अ.क्र.८५०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

श्री.गणेश आकाराम थोरात
वय : ३५ वर्षे, व्यव : धंदा
रा.सी १३/३, मातृछाया को.ऑ.सो.,
घरकूल, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.शारदाबाई आकाराम थोरात
वय : वर्षे, व्यव : गृहिणी
रा.थोरात मसाला स्टोअर, संत काक्या मार्ग,
शंकर मंदिराजवळ, धारावी मुंबई ४०००१७
२) श्री.अंकुश आकाराम थोरात
वय : ३८ वर्षे, व्यव :
रा.थोरात मसाला स्टोअर्स,
संत काक्या मार्ग, शंकर मंदिराजवळ,
धारावी, मुंबई ४०००१७ — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.आकाराम बंडू थोरात यांचा मृत्यू दि.१०/०४/२०१९ रोजी सवाडे, ता.कराड, जि.सातारा येथे झाला आहे. अर्जदार हे मयत कै. आकाराम बंडू थोरात यांचा मुलगा आहे. तसेच सामनेवाला क्रं.१ या कै. आकाराम बंडू थोरात यांच्या पत्नी आहेत. सामनेवाला क्रं.२, हा मुलगा आहे. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

मिळकतीचे वर्णन
मिळकत धारकाचे नाव : कै.आकाराम बंडू थोरात
फ्लॅट नं.सी-१३/0:३
घरकूल, से.१५, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड
ॲग्रीमेंट व्हॅल्यू- रु.३,५२,६७२/-
(रुपये तीन लाख बावन्न हजार सहाशे बहात्तर)
एकूण क्षेत्रफळ-४०.९७ चौ.फूट

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी. आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.आकाराम बंडू थोरात यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्याा हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीसीने सुचित करण्यात येत आहे की, खालील नमूद केलेली मिळकत ही पै.मोहम्मद रफिक शेख यांचे नावे महसूल दप्तरी असून नमूद मिळकत ही विकसन कराराने दि.११/४/२०१५ रोजी सिटी रिअल इस्टेटचे मालक श्री.अस्लम मुन्शी, रा.पनवेल यांचे बरोबर लेखी करार त्यांचे मोठे चिरंजीव मो.शफिक रफिक शेख यांचे समक्ष झाला असून मो.रफिक शेख यांचे निधन दि.३०/०८/२०२० रोजी झाले असून अशा परिस्थितीमध्ये त्यांचे वारसदार म्हणून कुटुंबांचे सदस्य लोकांनी दि.१६/०४/२०२१ व दि.१२/०५/२०२१ रोजी लेखी स्वरुपात धनादेश स्वीकारून नोटरी करार करून दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

फायनल प्लॉट क्र. २९६/ब	संपूर्ण क्षेत्र ७७५ चौ.मी.	मुंबई पुणे रोड, पनवेल

वरील मिळकत ही पै.मोहम्मद रफिक शेख यांच्या कराराने व त्यांचे वारसदारांनी भूखंड क्रं.२९६/ब, ७७५ चौ.मी.चा खुला ताबा व कब्जा सिटी रिअल इस्टेट तर्फे श्री.अस्लम मुन्शी यांचे ताबेकब्जात प्रत्यक्ष सदर जागेसंबंधी फलक लावून व कंपाऊंड मारुन ताब्यात दिले आहे. नोटीस प्रसिद्ध करण्याचे एकूण ४ कारण असे की,

१) सदर भूखंडावर बँक ऑफ बडोदा शाखा पनवेल यांचे कर्ज आहे.

२) वारसदार यांना कोर्ट/न्यायालय यांचेकडून वारस दाखला प्राप्त झाला नाही.

३) सदर भूखंडा खाली इंडियन ऑईल कंपनीची पेट्रोल व डिझेल साठा करणेची दोन टाक्या आहेत.

४) नोटीसीचे प्रसिद्धीचे मुख्य कारण सदर मिळकतीवर ऐजंट व वारसदार यांचेकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक किंवा बयाणा / मॉर्गिज / उसनवारी होवू नये अन्य त्रयस्थ इसमाचे नुकसान होवू नये म्हणून सावधान नोटीस जनतेसाठी देण्यात आली आहे.

जर कोणी अस्लम मुन्शी यांचे उपरोक्ष कोणतेही प्रकारे सदर भूखंडाबाबत करार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची स्वतःची राहील व होणाऱ्या नुकसान व परिणामास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच होणाऱ्या नुकसानास श्री.अस्लम मुन्शी हे बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०७/२०२१

सही/-
ॲड.जी.एल.ठोंगे
बी.ए.एल.एल.बी.
मो.नं.८८९८६३२८८१/९६९९१३७०५४

मे.राव साहेब

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अ.क्र.८६१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.प्रिती पद्माकर ठाकूर
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
पारा जवळ, ८२४ बोरी, ता.उरण, जि.रायगड
२) सौ.मनस्वी मनिष ठाकूर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
ग्रामपंचायत नागाव जवळ,
घर नं.२५, रा. नागाव मांडळ आळी,
ता.उरण, जि.रायगड
३) सौ.किमया पद्माकर ठाकूर
वय : ३५ वर्षे, धंदा : व्यवसाय
पारा जवळ, ८२४ बोरी, ता.उरण, जि.रायगड
४) श्री.भुषण पद्माकर ठाकूर
वय : ३३ वर्षे, धंदा : व्यवसाय
पारा जवळ, ८२४ बोरी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.पद्माकर दादाजी ठाकूर हे दि.२६/०७/२०२० रोजी मौजे : जेन्ट जॉर्ज गव्हरमेंट हॉस्पिटल मुंबई येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै. लक्ष्मीबाई दादाजी ठाकूर ह्या दि.१५/०७/२००१ रोजी मौजे पारा जवळ, ८२४ बोरी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.पद्माकर दादाजी ठाकूर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
म्हातवली	६	२८-३ (१) +१+२/B	१-४-८	0-४५-१

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.पद्माकर दादाजी ठाकूर यांच्या आईच्या नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.पद्माकर दादाजी ठाकूर यांचे वारसदार या नात्याने कै.पद्माकर दादाजी ठाकूर यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.पद्माकर दादाजी ठाकूर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.भाकरे साहेब
प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गडगे, ॲड.अजय पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अ.क्र.४४७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०८/२०२१

श्री.राजेश उर्फ राजेंद्र वामन म्हात्रे
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.सावित्रीबाई वामन म्हात्रे ही दि.२४/११/२०१९ रोजी मौजे : बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू पावली असून कै.सावित्रीबाई वामन म्हात्रे हिचे नावे खालील वर्णन केलेली संपादीत जमीन मिळकत असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	वहाळ-८४	१२०६	५	0-६-४
२		१२४	३	0-१-८
३		११0	११	0-५-0
४		९६	११	0-६-0
५		९२	४	0-१-८

कै.सावित्रीबाई वामन म्हात्रे हिचे अर्जदार हे कायदेशीर वारस असून त्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १९/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.राव साहेब

ॲड.योगिता पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अ.क्र.७८९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/०८/२०२१

श्रीमती.नंदा अशोक शिंदे
वय : ५९ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.-६६, केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.पार्वती अशोक शिंदे
वय : ९२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.मु.पो.चिंचोली, ता.बार्शी, जि.सोलापूर-४१३४०४
२) श्री.कुलदीप अशोक शिंदे
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.६६ केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.संदीप अशोक शिंदे
वय : ३९ वर्षे, व्यव : नोकरी
रा.ए-१०२, दत्तकृपा को.हो.सो.,
प्लॉट नं.६६, केंद्रीय विहार जवळ,
से.११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांचा मृत्यू दि.७/६/२०१० रोजी चिंचोली, ता.बार्शी, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार या मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांच्या पत्नी आहेत. तसेच सामनेवाला क्रं.१ या कै.अशोक नेताजी शिंदे यांच्या आई आहेत. सामनेवाला क्रं.२, ३ ही मुले आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

मिळकतीचे वर्णन
मिळकत धारकाचे नाव : कै.अशोक नेताजी शिंदे (५०% हिस्सा)
फ्लॅट क्रं.बी-६/0:२
घरकूल, से.१५, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड
ॲग्रीमेंट व्हॅल्यू-रु.४,६५,000/-
(रुपये चार लाख पासष्ट हजार)
५०% हिस्सा-ॲग्रीमेंट व्हॅल्यू-रु.२,३२,५00/-
(रुपये दोन बत्तीस हजार पाचशे)
एकूण क्षेत्रफळ-४०.९७ चौ.फूट

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी. आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.अशोक नेताजी शिंदे यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यांस वारस प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्याा हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

सर्पमित्रांनी दिले एकाचवेळी चार अजगरांना जीवदान

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील चिर्ले येथिल सर्पमित्र आनंद मढवी व पंकज घरत यांनी विविध ठिकाणी पकडलेल्या चार अजगरांना जीवदान देऊन त्यांना एकाचवेळी जंगलात सोडून त्यांना मुक्त केले.

चिर्ले गावाजवळ असणाऱ्या पौंडखार खाडीत अलंकार रसाळ यांनी मासे पकडण्यासाठी जाळं टाकलं होतं त्या जाळ्यात भला मोठा अजगर अडकला होता.काल सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास इंडियन रॉक पायथॉन (भारतीय अजगर)हा सर्वत्र आढळणारा सुमारे ९.५ फूट लांबीचा अजगर , के. के. लोजेस्टिक यार्ड गव्हाणफाटा मध्ये सुमारे ९ फूट लांबीचा अजगर तसेच ठाकूर फार्म हाऊस चिर्ले इथे ६.५ फूट लांबीचा व देशमुख लॉजेष्ट्रीक यार्ड मध्ये दुपारी १२ वाजता अजून एक भला मोठा सुमारे १० फूट लांब असणारा अजगर सर्पमित्र आनंद मढवी व पंकज घरत यांनी पकडले. या दुर्मिळ अजगरांना त्यांच्या घरात म्हणजे जंगलात सोडण्यासाठी त्यांनी वनपाल सशांक कदम साहेब, वनपाल डी. डी. पाटील, मेजर किरण देवकर, मेजर सूरदास धांडे, माया भोसले यांच्या उपस्थितीत या अजगरांचे पंचनामे केले व असे चार अजगर प्राणीमित्र आनंद मढवी,पंकज घरत,दिलीप मढवी ,सुमित मढवी,बंटी शेळके,विनीत मढवी,शुभम मढवी, विकी माळी, अक्षय माळी, प्रतिक घरत यांनी पकडून वनधिकारी मेजर किरण देवकर, मेजर सूरदास धांडे यांना माहिती दिली.व हे भले मोठे अजगर कान्होबा डोंगरातील जंगलात सुरक्षित सोडून दिले. या अजगरांना जंगलात मुक्त करते वेळेस वनधिकारी मेजर किरण देवकर, मेजर सूरदास धांडे,माया भोसले,प्राणीमित्र आनंद मढवी, पंकज घरत, दिलीप मढवी,बंटी शेळके, शुभम मढवी, विनीत मढवी आदी उपस्थित होते.

पनवेल परिसरात आढळला मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे, डोक्याचे केस बारीक काळे पांढरे, नाक सरळ, दाढी मिशी पांढऱ्या रंगाची वाढलेली, चेहरा उभट, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फूट असून अंगात पाढऱ्या, हिरव्या व राखाडी रंगाचा हाफ टिशर्ट व करड्या रंगाची हाफ पँट आहे.

अखेर नगरसेवक रविंद्र भगत यांचे उपोषण चौथ्या दिवशी स्थगित

मालमत्ता कराबाबत उचित निर्णय घेतला जाण्याचे दिले आश्वासन

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेच्या जाचक मालमत्ता कराला विरोध दर्शवित महापालिका क्षेत्रातील नागरिक पुढे आले आहेत. त्यातच कळंबोली येथील शेतकरी कामगार पक्षाचे कर्तव्यदक्ष नगरसेवक रवींद्र भगत यांनी पालिकेच्या जाचक नियमांच्या विरोधात सत्ताधाऱ्यांचे पितळ उघड पाडण्यासाठी बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले होते. अखेर आज चौथ्या दिवशी पालिकेच्या वतीने उपायुक्त विठ्ठल डाके यांनी उपोषणस्थळी नगरसेवक रवींद्र भगत यांची भेट घेवून मालमत्ता कराबाबत उचित कार्यवाही केली जाणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, काँग्रेसचे पनवेल जिल्हा कार्याध्यक्ष सुदाम पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे नगरसेवक, नगरसेविका तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेच्या सत्ताधारी पक्षाने यापूर्वी मालमत्ता कराबाबत नागरिकांना अंधारात ठेवून निवडणुकांमध्ये कर घेतला जाणार नसल्याचे गाजर दिले होते. प्रत्यक्षात नागरिकांना करामध्ये सवलत नसून सोयी सुविधा हव्या आहेत. गेली ४ वर्षे त्यांना सिडकोकडून मिळत असलेल्या सुविधांचा त्यांनी कर भरलेला असताना पालिका नागरिकांकडून दुप्पट कर वसुली करण्याचा घाट घालत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात पालिकेच्या अधिकाऱ्यांसह सत्ताधाऱ्यांबाबत रोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपच्या नगरसेविका लीना अर्जुन गरड यांनी देखील काही दिवसांपूर्वी कामोठे परिसरात मुक मोर्चा राबविला होता. सत्ताधारी भाजपा पक्षातील नगरसेवक विरोधात असल्यामुळे पालिकेच्या वतीने नागरिकांवर लादण्यात येणारा जाचक कर किती भयानक आहे, याची प्रचिती येते. या पार्श्वभूमीवर कळंबोली येथेही महाविकास आघाडीच्या वतीने मुक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते आणि आता नगरसेवक रवींद्र भगत यांनाही यासाठी तब्बल ४ दिवसांचे आमरण उपोषण करावे लागले. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची काही महिन्यांपूर्वी बदली करण्यात आली होती, मात्र मधल्या काळात आयुक्तपदाचा पदभार स्वीकारलेले सुधाकर देशमुख यांनी नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यास सुरुवात केल्याने त्यांची बदली करण्यात आली. नागरिकांचे प्रतिनिधी म्हणून वावरणाऱ्या लोकप्रतिनिधींना उपोषणाला बसावे लागणे ही बाब तितकीच गंभीर आहे मात्र त्याहूनही अधिक गंभीर बाब म्हणजे पनवेल महानगरपालिकेचे. नगरसेवक गेले ४ दिवस आमरण उपोषणाला बसले आहेत. अखेर आज चौथ्या दिवशी पालिकेच्या वतीने उपायुक्त विठ्ठल डाके यांनी उपोषणस्थळी नगरसेवक रवींद्र भगत यांची भेट घेवून मालमत्ता कराबाबत उचित कार्यवाही केली जाणार असल्याचे आश्वासन दिले.

उपोषणकर्ते - रविंद्र अनंत भगत - नगरसेवक
शेतकरी कामगार पक्ष
बेमुदत उपोषण

केलवणे गावातील रहिवाशांच्या घरांवर वानरांचे संकट

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

मुसळधार कोसळणाऱ्या पावसात ही केलवणे गावातील रहिवाशांच्या घराच्या छपरावर वानरांनी हैदोस घातला आहे. त्यामुळे रहिवाशांच्या घरांवरील पत्रांचे, कौलांचे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी संकटग्रस्त, भयभीत झालेले रहिवाशी करत आहेत.

विकासाच्या नावाखाली पनवेल, उरण तालुक्यातील जंगल भागात मोठ्या प्रमाणात दगड, मातीचे उत्खनन केले जात आहे. उन्ह पावसाळ्यात ही राजरोसपणे वन अधिकारी व महसूल अधिकारी यांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या अशा दगड मातीच्या उत्खननामुळे वन प्राणी अन्नाच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने मानवी वस्तीत येऊ लागली आहेत. त्यात केलवणे गाव परिसरातील जंगलातील वानरे ही मोठ्या संख्येने अन्नाच्या व सुरक्षिततेच्या शोधार्थ केलवणे गावातील फळ झाडांवर तसेच रहिवाशांच्या घराच्या छपरावर वावरताना दिसतात. जंगलातून आलेली वानरे ही फळ झाडांचे नुकसान तर करत आहेत.त्यात ऐन पावसाळ्यात घरांच्या छपरावरील पत्र्याचे, कौलांचे ही नूकसान करत आहेत.

ऐन पावसाळ्यात केलवणे गावातील रहिवाशांच्या घरांवरील छतावर हैदोस घालणाऱ्या वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी केलवणे गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा खलाशी महासंघाचे अध्यक्ष विश्वनाथ म्हात्रे व भावना शिवकर या महिले बरोबर इतर रहिवाशी मागणी करत आहेत.

मुरुड तालुक्यातील एकदरा गावाजवळील तीर्थक्षेत्र गायमुख जवळ डोंगराला पडली मोठी भेग

दै.रायगड नगरी । मुरुड

मुरूड शहराच्या लगतच असलेला एकदरा गाव डोंगरावर वसलेला असून त्याच डोंगराच्या मागील बाजूस तीर्थक्षेत्र गायमुख आहे. तेथे शंकराचे देवस्थान असून भाविक महाशिवरात्रीला, सोमवारी तेथे दर्शनासाठी जातात तसेच अस्तिविसर्जन सारखे विधी तेथे केले जातात.

तेथील डोंगराला अतिवृष्टीमुळे मोठी भेग गेली असून सध्यातरी तेथून एकदरा ग्रामस्थांची घरे दूर असल्याने धोका कमी आहे. परंतु ती भेग वाढत जाऊन गावालगतच्या डोंगरपर्यंत आल्यास गावाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

स्थानिक प्रशासनातील तलाठी, मंडल अधिकारी यांनी सदर जागेचा पंचनामा केला असून, सध्यातरी पाऊसाचा जोर कमी असला तरी गुरुपौर्णिमेला पाऊसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

एसटी बंद असल्यामुळे ग्रामीण भागाचे नुकसान? गाव तिथे एसटीची प्रतीक्षा

दै.रायगड नगरी । पेण

गाव तिथे एसटी असे समीकरण मागील अनेक वर्ष जुळलेले होते. मात्र कोरोना व त्या नंतर लागलेले निर्बंध यामुळे एसटी ची सेवा रायगड जिल्ह्यात कोलमडलेली दिसत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला होता. मात्र आता एसटी हळूहळू पूर्वपदावर येत असून प्रवाशांची वाढती मागणी पाहता रायगड जिल्हा परिवहन मंडळाने बस फेऱ्या वाढविण्यास सुरुवात केली आहे खरी, मात्र या फेऱ्या फक्त शहरी भागातच सुरु असल्याने एसटी च्या उत्पन्नाचा मुख्य आधार असलेल्या ग्रामीण भागातील प्रवासी आज ही एसटी च्या प्रतीक्षेत असून एसटी बंद असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांचे मोठे नुकसान होत आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, मुरुड, कर्जत, श्रीवर्धन, माणगांव, महाड, रोहा अशा आठ आगारात ४७२ बसेस उपलब्ध आहेत. यातील सध्या २५३ बस कार्यरत आहेत. रोज १०४२ होणाऱ्या फेऱ्या मार्फत प्रवासी वाहतूक केली जाते. रायगड विभागात ७५३ वाहक तर ७४६ चालक काम करत आहेत. जानेवारी पासून जून पर्यंतच्या सहा महिन्यातील प्रवासी संख्येचा विचार केला तर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची घोषणा व्हायच्या अगोदर म्हणजेच जानेवारी मध्ये २९ लाख ८७ हजार २०४ प्रवाशांनी, फेब्रुवारी मध्ये ३२ लाख ५४ हजार २६१ प्रवाशांनी तर मार्च मध्ये ३९ लाख ४३ हजार ७७४ प्रवाशांनी एसटीचा केलेला प्रवास हा चढता क्रम दर्शवित आहे. तर त्यानंतर लॉकडाउनमधील निर्बंध काळात पुन्हा प्रवाशी संख्येत घट होऊन एप्रिलमध्ये १७ लाख १८ हजार ९६३ तर मे महिन्यात २ लाख ९ हजार ५९३ अशा उतरत्या क्रमाला एसटी महामंडळाला सामोरे जावे लागले. परंतु त्यानंतर पुन्हा शंभर टक्के प्रवास करण्याची परवानगी मिळाल्यानंतर जून महिन्यात पुन्हा प्रवासी संख्या वाढून ६ लाख ९ हजार ७६३ प्रवाशांनी एसटीचा प्रवास केला आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटे नंतर रायगड जिल्ह्यातील एसटी वाहतूक सुरु झाली असली तरी मुंबई, पनवेल, ठाणे, नालासोपारा, पुणे या मार्गावर तसेच शहरी भागात सुरू आहे. ग्रामीण भागात अद्याप ही वाहतूक सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना ऑटोरिक्षा – मिनीडोअरचा आधार घ्यावा लागत असून २० रुपये भाडे ऐवजी ४० रुपये असे गावातून शहरात येण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात बसेसच्या फेऱ्या सुरू करण्याच्या विचाराधीन आम्ही आहोत. मात्र आधीच आर्थिक कोंडीत सापडलेल्या एसटी महामंडळाला डिझेलची दरवाढ लक्षात घेता प्रवासी कमी असतील तर तोट्यात जायला नको, याची चाचपणी म्हणून आम्ही प्रत्येक ग्रामपंचायत मार्फत बस सुरू करण्यासाठी हमीपत्र मागवत आहोत आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. येणारा गणेशोत्सव लक्षात घेता लवकरच बसेस सुरू करू.

- अनघा बारटक्के,
विभाग नियंत्रक-रायगड

सध्या कोरोनाचे निर्बंध कमी झाले आहेत. खाजगी वाहतूकदार सर्वत्र व्यवसाय करत आहेत. खेडे गावातील प्रवाशांना खाजगी गाड्यांना जास्त भाडे भरुन प्रवास करावा लागत आहे. एसटी ने लांब पल्ल्याच्या गाड्या सुरु केल्या आहेत ; तर ग्रामीण भागातील गाड्या देखील लवकरच सुरु कराव्यात.

- जगदीश पेरवी, प्रवासी, दादर, ता.पेण

खेडेगावात बस सुरु करण्यासाठी एसटी महामंडळ कोणत्या मुहूर्ताची वाट पाहत आहे.

गावात बस सुरु नसल्याने खाजगी मिनिडोअरचा आधार घ्यावा लागतो. एसटी ने बस सुरु केल्यावर प्रवासी बसला प्राधान्य नक्कीच देतील

-रमेश पाटील, प्रवासी,
बळवली, ता.पेण

जनसुनावणी ही योग्य पद्धतीने होत नसल्या बद्दल शिवसेनेने घेतला आक्षेप

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघरमधील सुरू असलेली जनसुनावणी ही योग्य पद्धतीने होत नसल्याच्या तक्रारी शिवसेनेकडे आल्यानंतर शिवसेना खारघर शहरप्रमुख शंकरशेठ ठाकूर व युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, विभागसंघटक रामचंद्र देवरे, शहर अधिकारी विनोद पाटील यांच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांना ३ दिवसांपूर्वी निवेदन दिले होते. त्यास आयुक्तांनी प्रतिसाद न दिल्याने आज दि. २२ जुलै रोजी खारघरमधील ग्रीनफिंगर शाळेत सुनावणी सुरू असलेल्या ठिकाणी माहिती घेण्यासाठी शिवसेना युवासेना महिला आघाडी पदाधिकाऱ्यांनी धडक मारली.

नागरिकांच्या ज्या मूळ हरकती आहेत त्यांना बगल दिली जात तक्रार केली व दिखाव्यासाठी होत असलेली जनसुनावणी बंद करून सार्वजनिक रित्या जनसुनावणीची घ्या अशी मागणी केली. तोवर जनसुनावणी बंद करावी अशी मागणी शिवसेनेने केली असता, आयुक्तांनी नागरिकांच्या इतर हरकतीचे निरसन करण्यासाठी शिवसेनेच्या वरिष्ठांशी चर्चा करून योग्य पर्यायासाठी दोन दिवसांची वेळ मागितली आहे. अशी माहिती सह आयुक्तांनी दिली.

या जनसूनावणीची माहिती घेण्याकरिता शिवसेना खारघर शहरप्रमुख शंकरशेठ ठाकूर, शहर संघटक अनिलदादा पाटील, विभागसंघटक रामचंद्र देवरे, युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, शहर अधिकारी विनोद पाटील, महिला आघाडीच्या उपमहानगर संघटिका रिनाताई पाटील, शहर संघटिका नंदाताई चेडे, नवनिर्वाचित उपशहरप्रमुख नंदू वारूंगसे, विभागप्रमुख संजय सावंत, उत्तम मोर्बेकर, उपविभागप्रमुख परशुराम देवरुखकर, शाखाप्रमुख प्रशांत जांभूळकर से.१२, सचिन ठाकूर से.२, सतिश चेडे से.११, उपशाखाप्रमुख संतोष शिंदे, सचिन वाघमारे युवासैनिक संकेत पाटील प्रकाश राजपूत सुधीर शिंदे यांच्यासह सामान्य नागरिक उपस्थित होते.

तरी जनतेला आम्ही आवाहन करतो की, या अधिकाऱ्यांच्या दडपशाहीला व भूलथापांना बळी पडू नका आणि कृपया मालमत्ता कर भरू नका.

- शंकरशेठ ठाकूर, खारघर शहरप्रमुख

गोवे येथे पुराचे पाणी रस्त्यावर : पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केली पाहणी

दै.रायगड नगरी । खांब–रोहा

संपूर्ण रायगड सह कोलाड विभागांत बुधवार सकाळ पासून सुरू झालेल्या वादळी मुसळधार पावसाने झोडपले असून गोवे येथे पुराचे पाणी रस्त्यावर आल्याने रायगडाच्या पालकमंत्री कु अदिती तटकरे यांनी गोवे येथे या पाण्याची पाहानी केली.

बुधवार सकाळ पासून अचानक पाऊसाने जोर धरल्याने कुंडलिका नदीची पातळी वाढली तर गोवे येथील नदीला खांड (भगदाड) पडल्याने व त्यातच नदी प्रवाह पलटी झाल्याने पुराचे पाणी काहींच्या घराच्या जवळ तसेच अंतर्गत रस्त्यावर आले होते.या पुराच्या पाण्याची पाहानी पालकमंत्री अदिती तटकरे यांनी गुरुवार सकाळी केली यावेळी.

पालकमंत्री आदिती ताई तटकरे, महेंद्र पोटफोडे सरपंच ग्रा.प. गोवे, उपसरपंच नितीन जाधव, सरपंच नरेंद्र पवार, सौ.सुप्रिया जाधव, नरेंद्र जाधव, पाटबंधारे अशोक लोहार, गायकवाड, तलाठी नंदकुमार हिंदोळे, ग्रामसेवक गोविंद शिद, पोलीस पाटील गोवे राजेश शिर्के, मधुकर गावकवड, गोविंद गायकवाड, किसन ठाणेकर, मनोहर मांजरे, भरत जाधव इत्यादी गोवे ग्रामस्थ हजर होते.

अतिवृष्टीमुळे चिकणी पुलाची दुरावस्था

दै.रायगड नगरी । कोर्लई

गेल्या चार–पाच दिवसांपासून पडत असलेल्या जोरदार पावसामुळे साळाव–मुरुड रस्त्यावर काशिद ग्रामपंचायत हद्दीतील चिकणी पूलाचा भराव खचल्याने दुरावस्था झालेली असून ते पूल धोकादायक बनला आहे.

जोरदार पावसामुळे दि.११ जुलै रोजी तालुक्यातील काशिद पूल कोसळून घडलेली घटना ताजी असताना पावसाळ्यापूर्वी तालुक्यातील छोट्या मोठ्या पूलावरुन झालेल्या अवजड वाहतूकीने पूल कमकुवत होऊन त्यांना अखेरची घरघर लागल्याचे चित्र चिकणी, विहूर येथील पूलाच्या पावसाळ्यात झालेल्या दुरावस्थेने समोर येत असल्याचे बोलले जाते आहे.

याकरिता तालुक्यातील सर्व जून्या–नव्या पूलांची पाहाणी करण्यात येऊन योग्य ती उपाययोजना करण्यात याव्यात. अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांतून होत आहे.